प्रेसनोट

दि.२५/११/२०२०

## राज्य उत्पादन शुल्क विभाग पुणे येथील दुय्यम निरीक्षकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

---

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आरोपी - १ लोकसेवक :- आनंद दत्तात्रय काजळे, वय ३९ वर्षे, पद - दुय्यम निरीक्षक, नेमणुक - राज्य उत्पादन शुल्क एच. विभाग बिट क्रमांक २ पुणे<br>२- खाजगी इसम :- गणेश राजेंद्र परीट वय - ३३, धंदा - चालक रा. ३२ नंबर शाळेच्या पाठीमागे, हडपसर पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/- (वीस हजार रूपये) |
| लाच स्वीकारली रक्कम | तडजोडीअंती ७,०००/- (सात हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- दि. १४/१०/२०२०, दि. ०३/११/२०२०, दि. ०४/११/२०२०, ०६/११/२०२०, ०९/११/२०२० व दि.१०/११/२०२०<br>सापळा दिनांक :- २५/११/२०२०,<br>यातील तक्रारदार यांनी आरोपी क्रमांक १ याचेकडे नोकरनामा मिळण्यासाठी अर्ज दिला. त्यावेळी आरोपी क्रमांक १ यांनी तक्रारदार यांचेकडे चार महिन्यांचे २०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती ७,०००/- रूपये लाचेची मागणी केली व खाजगी स्कॉर्पिओ वाहनात बसून आरोपी क्र. २ च्या मार्फतीने ती लाच रक्कम स्विकारली असता रंगेहात पकडण्यात आले असून त्या दोघांवर वानवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री.सुरज गुरव, ला.प्र.वि.पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.